दिनांक :– ०८.०६.२०२०

**प्रेसनोट**

**आरोपी लोकसेवक उत्तम रतनराव डाखुरे, वय–५० वर्ष, वर्ग–३, मंडळ अधिकारी, (मंडळ कळमनुरी) तहसिल कार्यालय, कळमनुरी, वर्ग–३, व सुनिल नागोराव शिंदे, वय – २७ वर्ष, (खाजगी इसम), रा. हातमाली यांना ३०,०००/– रू.ची लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेण्यात आले.**

---

पिडीत तक्रारदार यांनी दि.०१.०६.२०२० रोजी तक्रार दिली होती की, दिनांक २५.०५.२०२० रोजी तलाठी श्री पाखरे व मंडळ अधिकारी श्री डाखुरे यांचे पथकाने तक्रारदार यांचा वाळुची वाहतुक करणारा ट्रॅक्टर कोणतीही कार्यवाही न करता सोडून दिल्याचा मोबदला व तक्रारदार यांचा वाळुची वाहतुक करणारे ट्रॅक्टरवर महिनाभर कोणतीही कार्यवाही न करण्यासाठी हप्ता म्हणून स्वत:साठी व तलाठी श्री पाखरे यांचेसाठी ३०,०००/–रू. च्या लाचेची मागणी करीत असल्याबाबत अॅ.क.ब्युरो हिंगोली कार्यालयात तक्रार दिली. त्यावरून दि.०१.०६.२०२० रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली. सदर तक्रार पडताळणीमध्ये लोकसेवक डाखुरे यांनी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/–रू. लाचेची मागणी करून लाच स्विकारण्यासा सहमती दिली.

त्यावरून आज दि.०८.०६.२०२० रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक उत्तम रतनराव डाखुरे, मंडळ अधिकारी, (मंडळ कळमनुरी) तहसिल कार्यालय, कळमनुरी, यांनी कळमनुरी बस स्थानका जवळील पुरोहित स्विट मार्ट मध्ये लाचेची रक्कम ३०,०००/–रू. अंदाजे १५.४६ वाजताच्या सुमारास स्विकारून ती रक्कम खाजगी इसम सुनिल नागोराव शिंदे, रा. हातमाली यांच्याकडे दिली त्यांनी ती रक्कम मोजुन घेवुन स्वत: कडे ठेवुन लोकसेवक डाखुरे यांना लाच स्विकारण्यास मदत केली. म्हणुन लोकसेवक उत्तम डाखुरे, मंडळ अधिकारी व सुनिल शिंदे, खाजगी इसम यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले आहे. पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री हनुमंत गायकवाड, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी पोलीस निरीक्षक श्री नितीन देशमुख, पोलीस निरीक्षक श्रीमती ममता अफुने, ए.एस.आय. श्री संभाजी बुरकुले, पोहेकॉ श्री सुभाष आढाव, पोहेकॉ श्री अभिमन्यु कांदे, पोहेकॉ श्री विजय उपरे, पोना श्री तान्हाजी मुंडे, पोना श्री ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोना श्री विनोद देशमुख, पोशि श्री प्रमोद थोरात, चापोना श्री सरनाईक अॅ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप **www.acbmaharashtra.net** हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.१०६४, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५,**
**मोबाईल क्रमांक :– ८८८८७९७९९९, ९९२३०४२४६५, ८३९०७६१५०३**

Scanned by CamScanner